**२३ जुलै - चौदावा दिवस** - दारचेन कँम्पला सकाळी उठून चहा घेऊन आम्ही सतरा जणांचा 'ए' ग्रुप पायी कैलास परिक्रमेला निघाला. साधारण सहा कि.मी. अंतर चालून गेल्यावर एक यमव्दार लागले. असे म्हणतात की, या यमव्दाराखालून गेले तर मरणाची भीती वाटत नाही. पण आम्ही यात्रेच्या पहिल्या दिवसापासूनच एवढा कठीण आणि खडतर प्रवास केलेला होता की रोजच आम्हाला पावलो पावली मरण डोळ्यासमोर दिसत होते, त्यामुळे मरणाची भीती ही कशी राहिलीच नव्हती. पुढे ल्हाच्छू नदीच्या पात्रात आम्ही सगळे थांबलो. बर्फात व अती उंचावरच्या प्रदेशात चालणारा प्राणी 'याक' आम्ही घेतले होते. तेही लोक आले. या 'ल्हाच्छू' नदी पात्रातुन आम्हाला कैलासाचे प्रथम दर्शन झाले.

त्रिनेत्रधारी शंकर भगवानचे दर्शन! या एका सुवर्ण क्षणांसाठी घरापासून दोन हजार किलो मीटरपेक्षा जास्त अंतरावर गेल्या चौदा दिवसांच्या खडतर प्रवासानंतर आलेला हा सुवर्णक्षण स्वत:च्याच भाग्याचा हेवा वाटावा असा हा सुवर्णक्षण. त्या कैलास पर्वताचे, यावर समुद्रमथंनात निघालेल्या विषेचा प्याला प्यालेल्या नि अंगाची आग शांत करायला आलेल्या शंकराच्या निवासस्थानाचे प्रत्यक्ष याचि देहि याचि डोळा दर्शन. आज जीवन सार्थक झाले. परमेश्वर किती महान आहे नि आपण मनुष्यगण किती क्षुद्र आहोत याची प्रचिती देणारा हा अनुभव फारच थोड्यांच्या नशिबात असलेला हा योग. कैलास पर्वताची उंची २२,१०० फूट. याचे वैशिष्ट्य म्हणजे याच्या आजूबाजूचे सगळे पर्वत हे तपकिरी रंगाचे आहेत. फक्त कैलासच काळाकभिन्न रंगाचा. पायथ्यापासून बराचसा उंच जणू काही अगदी उभा कडा. (दौलताबाद येथील देवगिरी किल्ल्यासारखा). त्याला शंकर भगवानाचा खांदा समजला जातो. त्यावर शिर आणि दोन नेत्र, भुवया आणि भुवयांची सावली डोळ्यावर पडलेली. दोन नेत्रांच्या बरोबर मध्ये तिसरा नेत्र. (बायका टिकली लावतात त्याठिकाणी) त्यावर उभे कपाळ, मागच्या बाजूला झुकलेल्या जटा. पांढरा शुभ्र चांदी सारखा चकाकणारा चेहरा. सुरुवातीला नेत्रांच्यावर काहीच दिसेना. हळूहळू ढग दूर बाजूला सरु लागले आणि शंकराचे पूर्ण रुप नजरेत भरु लागले. काय हा देखावा. ढगांची लपाछपी चालूच होती. खूप अंतर असल्याने उघड्या डोळ्याने फारसे स्पष्ट दिसत नाही. दुर्बिणीतून स्पष्ट रुप दिसू शकले. तेही थोडा वेळच. त्यानंतर सगळेच काही ढगाआड लपले. जणू शंकराने थोडा वेळ दर्शन देऊन तपश्चर्येसाठी माघारी गेले असावेत. त्रिनेत्रधारी भगवान शंकराचे प्रत्यक्ष दर्शन हे आयुष्यातले सगळ्यात मोठे पुण्य. याच्यापुढे सगळे काही थिटे.परमेश्वराला साष्टांग दडंवत घालून ते सोजस रुप डोळ्यात घेऊन आम्ही पुढच्या परिक्रमेला सुरुवात केली. हे रुप उत्तर भागाकडुन दिसते.

ल्हाच्छू नदीच्या पात्रांतुन मार्ग होता. काही ठिकाणी पाण्याचे प्रवाह ओलांडावे लागले. आम्ही १७,००० फूट उंचीवर होतो. रस्ता खडतर होता. दुपार टळली होती. पूर्वेच्या बाजूने मार्गक्रमण करीत होतो. याकवर आरोहण करायचे. याक हा मोठ्या आडदांड रानटी बैलासारखा प्रचंड केसाळ प्राणी. अत्यंत निर्बुध्द प्राणी. चार चार लोकांना न आवरणारा. त्याच्यावर आरुढ होणे हा एक सोहळाच. पुढच्या शिंगांनी दोघांनी धरायचे. मागून दोन जणांनी आपल्याला उचलून त्याच्यावर बसवायचे. निदान ३/४ वेळा प्रयत्न केल्यानंतरच त्याच्यावर बसता यायचे. हा प्राणी पाठीमागे निमुळता, सरळ उभा राहिला तरी आपण पाठीमागे निसटतो. त्याची मान अतिशय लहान, तिला घट्ट धरुन बसायचे. थोडा जरी चढ आला तरी आपण मागे मागे सरकतो, निसटतो, नि खाली पडतो. बरे हे याकवाले, एकदा बसवून दिले की जणू त्यांचा काही संबंधच नाही. अगदी अलिप्त. आपण कितीही ओरडा, हाका मारा, किंचाळा पण जोपर्यंत आपण पडुन जमिनीवर आपटत नाही तोपर्यंत ते तुमच्याजवळ येणार पण नाहीत. बर हे याक कधीच सरळ चालत नाहीत. रस्ता सोडुन भलतीकडे धावत सुटणार. एकमेकांशी लढाया करणार आणि आपण वर मन घट्ट करुन, घाबरुन, डोळे मिटून बसून राहणार किंवा खाली पडणार. कुठेही गवत दिसले की चाललाच याक गवताकडे. दोन याक एकमेकांना घासतच चालणार. केवळ अगदीच नाईलाज झाला तरच याकची सफर करावी अन्यथा पायी चालणे हे सर्वांना उत्तम, निर्धोक आणि कमी त्रासाचे. पण उभा चढ, अती उंचावर असल्याने ऑक्सीजन कमी, दोन पावले चालले तरी दम लागणार म्हणून नाइलाजाने याकवर बसावे लागते. पूर्वेकडुन जात असल्यामुळे, नदीपात्रातला रस्ता असल्याने संध्याकाळी लवकरच अंधार जाणवायला लागला. कैलासाची पूर्व बाजू. कुठे अगदी एकदम काळाकभिन्न पहाड तर कुठे बर्फ वरुन खाली घरंगळतोय, वेगवेगळे नजारे. अंधार पडल्यावर डेराफूकच्या कँपवर जाऊन पोहोचलो. याकवरच्या थोड्याशाच सफरीने मांड्या दुखायला

लागल्या होत्या. हवा विरळ आणि थंड. त्याचा मात्र आम्हांला त्रास झाला. कँपवर कसातरी ‘स्वयंपाक’ करुन दोन घास पोटात ढकलून जमिनीला पाठ लावली अन् तत्काळ निद्राधिन झालो. पहिल्या दिवसाची परिक्रमा जवळजवळ बावीस कि.मी.ची झाली.

**२४ जुलै - पंधरावा दिवस** - सकाळी सूर्योदयाच्या पुर्वी कैलास पर्वताच्या बर्फावर सुर्योदयाची पहिली किरणे जेंव्हा पडतात तेंव्हा अगदी सोनेरी रंगाचा होतो त्या गोल्डन कैलासचे दर्शन काही जणांना झाले. आम्हांला थोडासा उशीर झाल्याने ते होऊ शकले नाही हे आमचे दुर्देव. कैलास परिक्रिमेचा दूसरा दिवस व या सबंध यात्रेतला सगळ्यात कठीण प्रवासाचा दिवस. सकाळी लवकर निघून अतिशय उभा कडा चढावा लागतो. त्यात त्या याकचा तमाशा वेगळाच. आपण सगळ्यात उंच ठिकाणी (म्हणजे परिक्रमेचा) १९,५०० फूटावर डोलमा पास येथे येतो. प्रचंड मोठे दगड व शिला यांच्यातुन रस्ता काढत, हवा अतिशय विरळ, ऑक्सिजन कमी, खूप दम लागतो. पण इथेच शंकराची पूजा व हवन केले जाते. येथे कुठलेही देऊळ नाही. ही साधारणत: दक्षिण बाजू, कैलासच्या पाठीमागे प्रचंड मोठे ग्लेसियर दिसले. साधारणत: एक तास थांबून आम्ही डोलमा पास उतरायला लागलो. जवळच गौरी कुंड आहे. बर्फाळ हिरव्या रंगाचे पाणी. हे पार्वतीमातेचे कुंड आहे. इथे आम्हांला बर्फावरुन चालावे लागले. वरुन बर्फ आणि त्याच्या खाली पाणी वाहते. एका ठिकाणी पाण्याची चारी, बर्फ फाटल्याने झालेली, ओलांडावी लागली. तिथे मात्र प्राण कंठाशी आले. उडी मारायची नि उडी अपुरी पडली किंवा पाय घसरला तर १५-२० फूट खोल पाण्यात. कोणी जीव वाचवायलाही येणार नाही. परमेश्वराची आराधना चालूच होती. प्रत्येक श्वासागणिक ॐ नम: शिवायचा जाप चालूच होता. कोणालाही त्रास न होता आमचा बर्फावरचा छोटा प्रवास सुखरुप पार पडला. सबंध डोंगर उतरुन आम्ही दुपारी ल्हाच्छू नदीपात्रात आलो. तिथे फराळ केला आणि पुढच्या कँपच्या मार्गाला लागलो. रात्री कँपवर पोहोचलो. या सबंध प्रवासात आम्हा यात्रेकरुंशिवाय आणि याकवाल्यांशिवाय कोणीही नव्हते. रात्री प्रचंड हवा चालू होती. खूप थंडी होती. जुटुलपुक कँपला पोहोचायला रात्र झाली होती. आजचा प्रवासही सुमारे २२ कि.मी. चा झाला.

**२५ जुलै - सोळावा दिवस** - कैलास परिक्रमेचा तिसरा आणि शेवटचा दिवस. एकूण बारा कि.मी. अंतर. अगदी सरळ प्लेन रस्ता. जोंगछू नदीच्या काठाकाठाने पण कैलास पर्वतापासून थोडे दूर अशा रस्त्याने हा साधा सरळ प्रवास. कैलासच्या पश्चिमेकडुन दारचेन कँपकडे परत दुपारीच दारचेनला पोहोचलो. प्रत्येकजण कैलासाची परिक्रमा सुखरुप पार पडल्याच्या अत्यानंदात परमेश्वराचे आभार मानून एकमेकांना आलिंगन देत आनंदात सहभागी होत होते. एक साफल्याचा आनंद. सगळा श्रमपरिहार झाला होता. अर्धी यात्रा सफल झाली होती. गुरला मंधाता पर्वतांच्या बर्फाच्छादित शिखरांचे दर्शन घेत संध्याकाळी एकत्र गप्पा मारत बसलो. रात्री दारचेनला मुक्काम.

कैलास पर्वताला मेरु पर्वत असेही संबोधले जाते. तसेच या विश्वाचा मध्य (सेंटर) समजले जाते व सगळे ब्रम्हांड याभोवती फिरते असे मानतात. कैलास पर्वत म्हणजे स्वर्गाला चुंबणारे, उगवत्या सुर्यासारखे तेजस्वी, धूरविरहित अग्निसारखे, मोजता न येणारे व जवळ जाता न येणारे असे हे स्थान मानले जाते. याचा दाखला शिवपुराणातल्या १३ व्या अध्यायात, तसेच स्कंद पुराणात, रामायण, महाभारत, तसेच कालीदासाच्या कुमारसंभवम् मध्ये तसेच इतर अनेक धर्म ग्रंथात मिळतो. तिबेटी लोक एकाच दिवसात कैलासाची परिक्रमा करण्याचा संकल्प करतात आाणि त्याला १२ ते १७ तास लागतात. तिबेटी लोक साष्टांग दंडवत घालत सुध्दा ही परिक्रमा करतात. ती शारिरीक दृष्ट्या अतिशय त्रासदायक असते पण त्यांना ही परिक्रमा करतांना अध्यात्मिक पुर्नजन्म झाल्याची अनूभुति मिळते असे समजतात. कैलासच्या तीन अथवा तेरा परिक्रमा करणे हे अतिशुभ मानले जाते. ११ परिक्रमे नंतर अतंरकैलास (Inner Kailas) ला जाण्याची मानसिक दृष्ट्या तयारी होते. असे गेलेले कोणी पहाण्यात नाही किंवा ऐकिवात नाही. कैलासावरुन चार नद्या उगम पावतात त्या म्हणजे उत्तरेकडे सिंधु, पूर्वेकडे ब्रम्हपुत्रा, पश्चिमेकडे सतलज, व दक्षिणेकडे कर्नाली.

कैलास पर्वत व मानससरोवर हे तिबेट (चीन) मध्ये आहे. १९८१ पासून ही यात्रा भारत सरकारच्या चीन बरोबरच्या अनेक दिवस वाटाघाटी केल्यानंतर सुरु झाली. आणि त्यानंतर १४ ते १६ बॅचेस दरवर्षी जात असतात.

कैलासाचे दर्शन झाल्यानतंर आणि या निसर्गातल्या प्रवासाने एक गोष्ट नक्कीच जाणवते की या सबंध ब्रम्हाडांच्या संदर्भात माणुस किती क्षुद्र आहे, लहान आहे, या यात्रेमुळे आपले स्वत:चे अस्तित्व असून नसल्यासारखे वाटते. कैलास पर्वतावर आपली कुठलीही आवडती गोष्ट सोडावी, त्यागावी असे म्हणतात. माझ्यासारख्या संतापी व तापट माणसाने त्याठिकाणी याचा त्याग केला. पण खरे पाहिले तर या सबंध यात्रेमुळे आपल्या सुक्ष्मतेची एवढी जाणीव होते की, कसला राग, संताप, व्देष, मत्सर, लोभ, या सगळ्याचे पलीकडे आपण जावून बसतो.

**२६ जुलै - सतरावा दिवस** - मानस सरोवर परिक्रमा आटोपून ग्रुप 'बी'च्या यात्रेकरुंना घेऊन उघडा ट्रक दारचेनला आला. त्यांना तिथे सोडले आणि आमचा ग्रुप मानस सरोवर परिक्रमेकरता होरेच्या कँपला आला. रस्त्याने इतकी प्रचंड धूळ होती आणि ट्रकमधल्या प्रवासाने अंग चांगलेच ठेचून निघाले होते. या कँपच्या जवळच चिनी सरकारच्या मिलिटरी कँपचे बांधकाम चालू आहे. त्यामुळे कँपच्या बाहेर पडायलाही बंदी आहे. मला तर भिती वाटते की हा मिलिटरी कँप पूर्ण झाल्यानंतर चिन सरकार कदाचित मानस सरोवराच्या परिक्रमेला बंदी आणेल की काय? कँपला पोहोचून खाणे आटोपले. मुक्काम मातीच्या भिंतीच्या कँपमध्येच.

**२७ जुलै - अठरावा दिवस** - मानस सरोवर परिक्रमेचा पहिला दिवस, अंदाजे ४० ते ४५ कि.मी. चालावे लागणार आहे. सकाळी सूर्योदयापूर्वीच परिक्रमेला सुरुवात केली. मानस सरोवराच्या काठाकाठानेच ही परिक्रमा होते. इथे बसायला घोडे मिळू शकतात. मानस सरोवर १५,००० फूट उंचीवर आणि कैलास पर्वतांच्या पश्चिमेला साधारण ४० कि.मी.अंतरावर. मानस सरोवर हे जगातील सर्वात उंच असे ठिकाणावरचे नैसर्गिक सरोवर. याची निर्मिती ब्रम्हांच्या मस्तिष्कशी जोडलेली आहे. याचा शोध राजा गुरला मंधाताने लावला अशी समजूत आहे. सरोवराचा परिघ जवळजवळ ९० कि.मी. असून त्याची खोली ९० मीटर (३०० फूट) पर्यंत आहे. आणि पूर्ण क्षेत्र अंदाजे ३२० चौ.कि.मी. आहे. मानस सरोवर आणि राक्षसताल हे एक नैसर्गिक गंगाछ्यू कालव्याने जोडले गेले आहे. या क्षेत्रातुन उत्तर भारतातल्या चार मोठ्या नद्या - करनाली, सतलज, ब्रम्हपुत्र आणि सिंधू या उगम पावतात. परिक्रमा करतांना ह्या नद्या ओलांडाव्या लागतात. रस्त्याने बौध्द भिक्षुकांचे मठ (मोनेस्ट्रीज) लागतात.

मानस सरोवराचे पाणी हे अतिशय गोड, काचेसारखे निर्मळ आहे. त्याला अमृतच समजले जाते. कुठल्याही प्रकारचे प्रदूषण नाही. त्यामुळे सरोवराचा तळ अगदी काचेसारखा नितळ दिसतो. हलक्या लाटांचे तरंग उठत राहतात. त्यांचा त्या शांत वातावरणात मधुर आवाज येत राहतो. येथे दुपारी अतिशय कडक ऊन असते आणि त्यामुळें आपली कातडी काळी पडते. पण त्याचबरोबर थंडगार हवाही चालू राहते. होरेच्या कँपहून सकाळी मानसच्या पश्चिम किनाऱ्याने सेरालुंग आणि येरंगो मठ पार करुन रात्री मुक्कामाला टुगो मठाजवळच्या कँपवर पोहोचलो.

**२८ जुलै - १९वा दिवस** - मानस सरोवर परिक्रमेचा दूसरा व शेवटचा दिवस. अंतर ३० ते ३५ कि.मी. सकाळी अगदी लवकर सूर्योदय होतो. मानस सरोवराच्या पाण्यातून सूर्य वर येतो. त्याची तांबूस प्रभा (किरणे) सर्व पाण्यावर पसरते. तसेच आकाशात सगळीकडे लालीमा पसरतो. सूर्य जसजसा वर यायला लागतो तसतसे सरोवराच्या पाण्याचे रंग भराभर बदलत राहतात. वर पांढऱ्या भुरकट रंगाच्या ढगांची धावाधाव चालू असते. कन्याकुमारीचा सूर्योदय, दार्जिलिंगचा सूर्योदय किंवा अशा कुठल्याही प्रसिध्द सूर्योदया इतकाच ह्या सूर्योदयाचे रुप अगदी आगळेवेगळेच आहे. सुदैवाने माझ्या व्हिडिओ कॅमेऱ्यात या सूर्योदयाचे अतिशय उत्कृष्ट चित्रण झाले आहे. या आजच्या प्रवासात पाण्यात खूप वेगळ्या रंगाचे, रुपाचे, जातीचे, आकाराचे पक्ष्यांचे दर्शन होते. मला एक सोनेरी रंगाच्या खूप मोठ्या पक्षांची जोडी दिसली. मानस सरोवरामध्ये राजहंस पक्षी राहतात हे नल दमयंती काव्यापासून ऐकले होते. पण यावेळी आम्हांला एकही राजहंस दिसला नाही. कारण यावेळचा उन्हाळा (?) त्यांना सहन होत नाही. म्हणून ते स्थलांतर करतात असे कळाले. काही सुंदर फुले ही दिसलीत. रस्त्यात एका ठिकाणी

खूप माशा दिसल्या. तो थोडा दलदलीचा भाग होता. आज कैलास पर्वताची पश्चिम बाजू व पूर्ण कैलास पर्वताचे दर्शन झाले. त्याचे वेगळेच रुप दिसले. या अंतरावरुन कैलास मेंढ्याच्या तोंडाच्या आकाराचा दिसतो. उत्तरेकडे जे नेत्र दिसले होते ते येथून नाकपुड्यां सारखे दिसते. वरचा भाग नाकासारखा, कपाळ हे डोक्यासारखे दिसते. त्रिशूलाच्या आकाराचेही दर्शन होते. कैलास आणि मानस सरोवराचे दर्शन आणि परिक्रमा हे अतिशय असाधारण पवित्र मानले जाते. यावर चार धर्माच्या लोकांचा विश्वास आहे. बोनपा म्हणजे तिबेटी लोक कैलासला नऊ मजल्याच्या स्वस्तिकासारखा मानतात. आणि दैमचौक आणि दोरजे फांगमो यांचे निवासस्थान मानतात. हिंदू लोक कैलासाला भगवान शंकराचे निवासस्थान मानतात. बौध्द धर्मिय कैलासाला बुध्दाचे आणि मणिपद्मचे निवासस्थान मानतात. जैन लोक त्यांचे पहिले तिर्थकर ऋषभदेव यांचे कैलासावरच निर्वाण झाले असे मानतात.

हिवाळ्यात ऑक्टोबर ते एप्रिल या कालावधीत कैलास आणि गुरला मंधाता या पर्वतमाला पूर्ण बर्फमय होतात. एवढेच नव्हे तर मानससरोवरही पूर्ण गोठून जाते. म्हणूनच जून ते सप्टेबर हा यात्रेचा काळ असतो. दुसऱ्या दिवशी कैलासाचे, गुरला मंधाताचे दर्शन घेत घेत मानस सरोवराच्या काठाकाठाने परिक्रमा करीत झैदीच्या कँपवर येतो. या कँपच्या आजूबाजूचा काठ हा लहान लहान दगडांनी भरलेला आहे. त्यात कोणाला भगवान शंकराची पिंड दिसते, कोणाला श्री गणेश दिसतो, कोणाला सर्पाने विळखा घातलेली शंकराची मूर्ति दिसते तर कोणाला त्रिशूल. बरेचसे शालिग्रामही येथे सापडतात. कैलास मानस या परिसराला देवभूमि म्हटले जाते म्हणून इथले सगळेच वातावरण अतिशय पवित्र मानले जाते. कैलासाची परिक्रमा करतांना आपण पर्वताच्या लांबूनच जात असतो. असे म्हणतात की या पर्वतावर कोणी पाय ठेवू शकत नाही. ज्यांनीही प्रयत्न केला ते कधीच परत आले नाहीत. शंकराच्या निवासस्थानाला आपला पदस्पर्श होऊन आपण ते अपवित्र करु शकत नाही. कोणी काहीही म्हटले आणि मानले तरी कैलास पर्वताचा खालचा भाग हा चोहोबाजूनी अगदी उभ्या तुटलेल्या कड्याचा असल्याने त्यावर चढणे केवळ अशक्य आहे. कोणी कैलास पर्वताला परिसाची उपमा देतात. रात्रीच्या निरव शांततेत ॐ नम: शिवायचे हुंकार ऐकू येतात असेही सांगतात. कोणाला मानस सरोवरातून त्रिशूल वर येतांना दिसते तर कोणाला पार्वतीमातेचे दर्शन होते. रस्त्याने जाताना आपल्या शेजारुन सुगंध दरवळल्याचा भास होतो. असे म्हणतात की तो सुगंध म्हणजे कोणी ऋषीमुनी किंवा देव हे मार्गक्रमण करीत असतात. आम्हांला कोणालाही यातले काहीच दिसले नाही. उंचावर मेंदूला ऑक्सिजनचा कमी पुरवठा झाल्याने हे भास होत असतात. हेल्यूसिनेशन हे शास्त्रीय कारणही कळाले. एक मात्र नक्की की वरच्या ढगांच्या प्रतिबिंबाने मानस सरोवराच्या पाण्याचे रंग सारखे बदलत असतात आणि क्षणाक्षणाला बदलणाऱ्या या रंगाचा खेळ खूपच मोहक असतो. आम्हांला सकाळी पाण्यात पूर्ण ॐ ची प्रतिकृती दिसली. कैलासाचे प्रतिबिंबही सरोवराच्या पाण्यात दिसले.

मानससरोवर हे ब्रम्हांने निर्माण केलेले सरोवर म्हणून त्याला ब्रम्हासर असेही म्हणतात. सानक, सानंदन, आणि सुजात, हे तीन साधू कैलास पर्वतावर भगवान शंकराची आराधना करीत होते. तेंव्हा १२ वर्षाचा दुष्काळ पडला. आजूबाजूचे पाण्याचे प्रवाह आटून गेले. त्यांना रोजच्या आंघोळीसाठी तसेच पूजाअर्चा करण्यासाठी खूप लांब असलेल्या मंदाकिनी नदीवर जावे लागत होते. म्हणून त्यांनी ब्रम्हाची आराधना केली, आणि त्यांचे तपश्चर्येचे फळ म्हणून मानससरोवराची निर्मिती झाली.

**२९ जुलै - २०वा दिवस** - आज आम्ही सगळेजण मानस सरोवरात स्नानाला गेलो. अगदी बर्फाचे पाणी, पाण्यात पाय टाकताच गुडघ्याच्या खाली पायच गायब झाल्यासारखे वाटले. मग सर्वांगाला मोहरीचे तेल चोपडुन थोडी मालिश करुन देवाचे नाव घेऊन पाण्यात डुबकी मारली. तिर्थाच्या कॅन्स् भरल्या. गौरीकुंडाचेही तिर्थ आणले होतेच. पितरांना तर्पण केले. कैलासाचे दर्शन घेत मानस सरोवराच्या काठी सगळ्यांनी विधिवत हवन-पूजन केले. यात्रा सफल पूर्ण झाली. आज विश्रांतीचा दिवस.

**३० जुलै -२१वा दिवस** - आज गुरुपौर्णिमा. कैलास परिक्रमेच्या 'बी' ग्रुपला दारचेन कँपहून घेऊन बस आमच्या झैदी कँपला आली. आमच्याबरोबर तामिलनाडूचे एक मुख्याध्यापक होते. गुरुपौर्णिमेच्या शुभ दिवशी व निमित्ताने मानसच्या काठावर आम्ही त्यांची पूजा केली. दोन्ही ग्रुप मिळुन पुन्हां हवन-पूजन केले आणि अतिशय भरल्या अंत:करणाने, कैलास आणि मानस दोन्ही परिक्रमा सुखरुप पार पडल्याच्या आनंदाने परमेश्वराचे आभार

मानून त्याच्या अस्तित्वाला हृद्यात सामावून आम्ही तकलाकोटच्या कँपकडे प्रयाण केले. कैलासाचे शेवटचे दर्शन घेतांना डोळ्यातुन अगदी ढळाढाळा पाणी वाहत होते. आपल्या अत्यंत प्रियजनाच्या विरहाचे दु:ख मनात होते. पुन्हां आयुष्यात कधी कैलासाचे दर्शन होईल याची काय शाश्वती? पुन्हां कधी परमेश्वर बोलवेल तेव्हांच हे शक्य होईल. रात्री तकलाकोटला मुक्काम.

**३१ जुलै - २२वा दिवस** - तिबेटमध्ये खोजारनाथ मठला भेट देण्यासाठी ट्रकने गेलो. तिबेटमध्ये राम, लक्ष्मण, सितेचे अगदी उत्कृष्ट मंदिर आहे. कैलासदर्शनाला जातांना हे तिघे या ठिकाणी थांबले होते त्याची आठवण म्हणून हे मंदीर बांधले आहे. त्याला भेट देऊन परत.

**१ ऑगष्ट - २३वा दिवस** - आज तिबेटमधला शेवटचा दिवस. उद्या सकाळी भारतात प्रयाण करायचे. आज कस्टम्स् वगैरेचे सगळे सोपस्कार पार पाडून सामान त्यांच्या ताब्यात दिले. काही जण शेवटची खरेदी करण्यासाठी बाजारात गेले. स्वेटर्स, विंडचिटर्स, शूज, चटया वगैरे खूपच चांगले मिळते. आज शेवटचा दिवस म्हणून गेस्ट हाऊसमध्ये कँप फायर केले. त्यात गाईड आणि गेस्ट हाऊसच्या चिनी कर्मचाऱ्यांनीही भाग घेतला.

**२ ऑगष्ट - २४वा दिवस** - अगदी सकाळी सूर्योदयाआधी बसने लिपूलेख पासकडे प्रयाण. घोड्यांचा प्रवास, नंतर बर्फावरचा पायी प्रवास करुन भारताच्या सरहद्दीवर आलो. येतांना होते तेच जातांना दृष्य. तिकडुन पुढच्या बॅचचे लोक चिनमध्ये येत होते आणि आम्ही भारतात जात होतो. आमचे पहिले घोडेवाले, हमाल, डॉक्टर, जवान सगळे भेटले. आलिंगने झाली. आमची यात्रा सफल झाली याचा आनंद आमच्या चेहऱ्यावर आणि आमच्या सफलतेत त्यांचा हातभार लागला याचा त्यांना झालेला आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. खूप गप्पा मारत नवीडांगला पोहोचलो. आता मात्र ॐ पर्वत शोधुनही सापडला नाही. ढगांआड लपल्याने त्याचे अस्तित्वही जाणवले नाही. आम्ही खरंच किती भाग्यवान होतो की येतांना ॐ पर्वताने आम्हाला दिवसभर दर्शन दिले होते. आता या परतीच्या प्रवासात एक एक कँप टाळून जवळ जवळ दुप्पट अंतर एकाच दिवसात पार पाडायचे होते. नवीडांगला जमा केलेले फोटोचे रोल्स घेतले, जेवण केले व मुक्कामाला पुढच्या कँपला म्हणजे कालापानीला गेलो. एकुण प्रवास १६ कि.मी. झाला. आजचा संपुर्ण प्रवास तकलाकोट ते लिपूलेख ते नवीडांग ते कालापानी हा फारच जास्त प्रवास झाला. पण परतीच्या मार्गाला लागल्याने समाधान असल्याने जाणवले नाही. येताना जे अनेक धबधबे दिसलेत ते आता गायब झाले होते आणि काही नवे धबधबे तयार झालेले दिसलेत.

**३ ऑगष्ट - २५वा दिवस** - कालापानी ते गुंजी. कालापानीला जमा केलेले सामान घेतले. गुंजीला पोहोचलो. तिथे भारताच्या साईडचे कस्टम चेकिंग झाले. मिलिटरीच्या डॉक्टरांना व जवानांना शुभेच्छा देऊन त्यांचा निरोप घेतला. पूर्वीचे पीआरडीचे चार जवान, डॉक्टर, वायरलेस वगैरे गुंजीहुन आमच्या पुढच्या प्रवासाला सोबत करु लागले.

**४ ऑगष्ट - २६वा दिवस** - गुंजी ते बुधी ते मालपा एकूण अंतर जवळ जवळ ३१ कि.मी. आज खूपच चालावे लागले. बुधीला जेवण घेऊन तिथे न थांबता पुढच्या म्हणजे मालपाच्या कँपला जावे लागले. बुधी ते मालपामध्ये नव्याने लँडस्लाईड झालेल्या होत्या. तो १४ कि.मी. चा प्रवास फारच खडतर होता. संध्याकाळ झालेली. अंधार झालेला आणि अशात त्या रस्त्याने प्रवास. त्याचा सगळ्यांनाच त्रास झाला.

**५ ऑगष्ट - २७वा दिवस** - मालपा ते गाला तोच धबधब्यांखालचा प्रवास. ज्या लँडस्लाईडने चिखलातला प्रवास करायाला लावला होता तो चिखल आता एकदम कडक होऊन छान रस्ता झाला होता.

**६ ऑगष्ट - २८वा दिवस** - गाला ते सिरखा ते पांगू आजही एक कँप टाळून पुढच्या कँपला पोहोचायचे. एकूण अंतर २४ कि.मी. येतांना जे चढ होते ते परतीच्या प्रवासात उतार. आणि उताराच्या प्रवासात खूपच त्रास

होतो. घोड्यावर बसता येत नाही. सिरखाला जेवण करुन पांगू पर्यंत पोहोचायला रात्र झाली. पाऊस पडत होता. रस्ता निसरडा झाला होता.

**७ ऑगष्ट - २९वा दिवस** - पांगू ते तवाघाट ते धारचूला. पांगूहून सकाळी निघून थानेधारकी चढाई उतरुन तवाघाटला आलो. घोडेवाले आणि हमाल तिथेच सुटले. बसने धारचुलाला आलो. ज्या धारचुलाला येतांना आम्हांला प्रचंड थंडी वाजत होती त्याच धारचुलाला आम्हांला खूपच गरम वाटत होते. कारण आम्ही आता हिमालयातुन खाली आलो होतो. महिनाभराच्या रोजच्या बदलत्या वातावरणाने शरीर कणखर झाले होते. सगळया पुरुषांच्या दाढ्या वाढल्या होत्या. वजन प्रत्येकाचे ७-८ किलोने कमी झाले होते. पँटस् कशाबशा बेल्टने आवळल्या होत्या.

ही संपूर्ण यात्रा इतकी कठीण, खडतर, इतके शारिरीक कष्ट देणारी पण कोणालाही असे कधीही वाटले नाही की आपण कुठुन झक मारली आणि या यात्रेला कशाला आलो, आपली चूक झाली किंवा चला, आता नको पुढे जायला, परत घरी जाऊ असा विचारही कधी मनांत आला नाही. कारण ध्यास आणि एकच ध्येय, कैलास दर्शनाचे.

**८ ऑगष्ट - ३०वा दिवस** - धारचूला ते अलमोडा बसने प्रवास. येतांना थोडेसे आडमार्गाला जाऊन पाताल भुवनेश्वर म्हणून एक शंकराचे स्थान आहे. त्याला भेट दिली. हे स्थान पूर्णपणे जमिनीखाली ५२ फूटावर आहे. त्यात प्रवेश अगदी चिंचोळ्या नळकांड्यासारख्या गुहेतुन आहे. तिथे पावसाने अतिशय निसरडे झाले होते. सरपटत जावे लागते. कैलासला म्हणजे स्वर्गात जाऊन आल्यावर आता पाताळात गेलो. खाली पुराणातले वेगवेगळे दाखले आहेत. एकाच ठिकाणी बद्रिनाथ, केदारनाथ, अमरनाथाच्या प्रतिकृति आहेत. तसेच चारी युगांच्या प्रतिकृति आहेत. शंकराची पिंड आहे. आणि तिथे एक चमत्कार घडला. एक लहान मुल हातात पाण्याने भरलेली कळशी घेवून माझ्यासमोर उभा राहिला. मी ती कळशी घेवून त्या पिंडीवर पाण्याचा अभिषेक करायची संधी मिळाली. आणि काय योगायोग तो दिवस श्रावणी सोमवार होता. रात्री उशिरा अलमोडाला पोहोचलो.

**९ ऑगष्ट - ३१वा दिवस** - अलमोडा ते दिल्ली सकाळी निघून रात्री हॉटेल अशोक यात्री निवासमध्ये पोहोचलो. तिथे यात्रेकरुंना घ्यायला मित्र, नातेवाईक आलेले होते. आपल्या माणसाला जिवंत परत आलेले पाहून घ्यायला आलेले लोक आनंदाने अक्षरश: रडत होते. मिठ्या मारीत होते. पुण्यात्मे म्हणून पाया पडत होते.

आम्ही दिल्लीला एक दिवस आधीच पोहोचलो पण नाशिकचे परतीचे रिझर्व्हेशन आधीच केलेले असल्याने एक दिवस दिल्लीत आराम केला. ११ला निघून १२ ला सकाळी पोहोचलो. स्टेशनवर घ्यायला आलेल्यांनी आम्हांला ओळखलेच नाही. कारण दाढी वाढलेली, वजन घटल्याने शरीर कृश झालेले, रंग काळा पडलेला, गाल आणि ओठ फुटलेले, कसे ओळखणार?

या यात्रेची थोडक्यात माहिती अशी

यात्रा १९५९ ते १९८० बंद होती. १९८१ मध्ये पहिली बॅच गेली. दरवर्षी एकूण चौदा ते सोळा बॅचेस् जातात. प्रत्येक बॅचमध्ये साधारणत: ३० ते ३५ लोक जातात. म्हणजे सबंध भारतातुन ४५० च्या आसपास लोक जातात. दिल्लीहुन कैलास पर्यंतचे एकूण अंतर ८६५ कि.मी. परिक्रमा धरुन जाऊन येऊन एकूण पायी /घोड्यावरचा प्रवास अंदाजे ३८० ते ४०० कि.मी. दिनचर्या - रोज सकाळी ५-५।। ला उठणे. पहिला चहा-बेड टी. त्यानंतर प्रातर्विधि आटोपल्यावर चहा नाश्ता, बोर्नव्हिटाचा मोठा ग्लास, देवाची आरती व रोल कॉल करुन प्रवासाला प्रारंभ. निघताना अंगावरचे कपडे असे - साधा बनियन, त्यावर वुलनचा बनियन, त्याच्यावर शर्ट नंतर हाफ स्वेटटर, फुल स्वेटर,त्याच्यावर विंडचिटर, फुल रेनकोट,पायात साधे पायमोजे,त्याचेवर वुलनचे पायमोजे,त्याचेवर वुलनची पँड, डोक्याला कानटटोपी, वर हॅट, आणि हातात हातमोजे,आणि हातात काठी असे युध्दाला निघाल्यासारखे. प्रवास सुरु झाल्यावर अंगावरचा एक कपडा उतरायला लागतो. कारण आतुन एवढ्या

प्रचंड थंडीतसुध्दा घामाच्या धारा सुरु होतात, आणि कँपला पोहचेपर्यंत फक्त  शर्ट पँट अंगावर राहते. कँपवर पोहोचल्यावर रसना किंवा तत्सम थंड पेयाने स्वागत. दुपारच्या जेवणात पोळी, भाजी, लोणचे, पापड, भात, दाळ, संध्याकाळी चहा, बिस्किट, नमकीन वगैरे. रात्री जेवणाआधी मोठा ग्लास सूप, रात्रीच्या जेवणात पोळी, भाजी, लोणचे, पापड, दाळ, भात व एक मिठाई - गुलाबजाम, खिर, रसगुल्ला वगैरे पूर्णपणे शाकाहारी. रस्त्याने छोटी छोटी हॉटेल्स अगदी योग्य ठिकाणी म्हणजे चढ संपल्यावर किंवा उतार संपल्यावर जेंव्हा चहा मिळावा अशा योग्य वेळी व योग्य स्थळी.

कुंमाऊ मंडल विकास निगमचे कर्मचारी यात्रेकरुंची सेवा करण्याच्या भावनेने भारावलेले व अगदी मनमिळावू, मदत करण्याची तयारी. रस्त्याने भेटणारे आयटीबीपी चे जवान, छोट्या छोट्या वस्त्यांचे लहान मुले, म्हातारी माणसे आपल्या यात्रेच्या वाटेवर आपल्या स्वागताला येतात. ॐ नम: शिवाय या मंत्रानेच एकमेकाला अभिवादन करतात. यात्रा पूर्ण करुन आल्यावर परतीच्या प्रवासात काही भाविक म्हातारी माणसे, तरुण चक्क आपल्या पाया पडतात. हिमालयातल्या त्या वाटेवर सगळे आपल्याला ‘पुण्यात्मे’ समजतात. आमचा वैयक्तिक अनुभव असा की, ही यात्रा आपल्यानें सहज शक्य होत नाही. तो परमेश्वरच आपल्याकडुन ही एवढी कठीण, खडतर यात्रा करवून घेतो. दिवसातुन शंभरदा मरण दिसत असतांनाही केवळ भगवान शंकराच्या दर्शनाच्या ओढीने, त्याच्या प्रेरणेनेच सगळी शारीरिक दु:खे विसरली जातात. कैलासाचे दर्शन ही पहिल्या दिवसापासून भावना असल्याने तिथे पोहोचेपर्यंतच्या मधल्या प्रवासाचे शारीरिक कष्ट जाणवले तरी परमेश्वराच्या नावापुढे विसरले जातात. कैलास मानसच्या दर्शनाने जीवन सार्थक झाल्याची अनुभूति होते.

आम्हांला प्रवासाचा खर्च दिल्ली ते दिल्ली ३६,०००/- प्रत्येकी सांगण्यात आला होता. दिल्लीला पोहोचल्यावर तो ७,५००/- ने कमी झाला. कारण सरकारने मदत दिली. यावर्षी (१९९७) तर खर्च फक्त रु.२५,०००/- च आहे. गुजरात सरकार त्यांच्या यात्रेकरुंना दिल्लीला जाण्यायेण्याचा खर्च, दिल्लीत गुजरात भवन मध्ये नाममात्र भाड्याने राहायची सोय व प्रवासाचे किट देऊन यात्रेला प्रोत्साहन देते. सरकारी कर्मचाऱ्यांना यात्रेसाठी अग्रहक्काने रजा मंजूर केली जाते. फक्त यात्रेपुरता सुध्दा पासपोर्ट मिळतो. शारीरिक फिटनेस व इच्छाशक्ती या दोन्ही गोष्टी अत्यंत आवश्यक. भगवान शंकर सगळ्यांना सुख शांती देवो हीच प्रार्थना!